Prefacе

१

# प्रस्तावना

कोणतेंही महत्त्वाचें कार्य पूर्ण होण्यास प्रयत्नांची पराकाष्ठा करावी लागते हें खरें आहे. परंतु त्यासाठी अनेकांच्या सहकार्याची आणि प्रोत्साहनाची आवश्यकता असते हें ही तितकेंच खरें आहे. वास्तव ' आधुनिक मराठी वाङ्मया-तील आत्मचरित्रांचे समीक्षण ' हा प्रबंध पूर्ण होण्यास ज्या सुहृदांनी सहकार्य केलें त्यांचा तसा नामनिर्देश करणें हें अगत्याचे आहे. आता हें खरें आहे की त्यांच्या नावाचा नुसता उल्लेख केल्याने मी त्यांच्या ऋणांतून मुक्त झालों असें होत नाही. परंतु त्यातल्या त्यात हाच एक मार्ग असल्याने मी त्यांचा तसा नामोल्लेख येथे करीत आहे. कारण हा प्रबंध पूर्ण झाल्यानंतर मी जेव्हां मागे वळून पाहिलें तेव्हां या चाहत्यांच्या प्रेमळपणामुळे आणि प्रोत्साहनामुळे हें कार्य शेवटास गेलें या विचारानें माझें अंतःकरण भरून आलें.

आत्मचरित्रा संबंधी लिहावें अशी माझी फार वर्षांपासूनची इच्छा होती. परंतु तशीं साधनें उपलब्ध नव्हतीं. एव्हढंच सर्व आत्मचरित्रें मिळविणें हेंच मुळी मोठ्या मुष्कीलीचें होतें. परंतु हें अवघड काम श्री. बी.एन.लुणिया, प्रिन्सिपॉल आनंद कॉलेज धार, यांच्या प्रोत्साहनामुळें सोपें झालें. त्यांनी सहानुभूती दाखविली नसती तर हें कार्य होणें अवघड होतें. त्यांच्या प्रोत्सा.. हनाबद्दल मी त्यांचा फार आभारी आहे.

काही अन्य भाषेतील आत्मचरित्रांची यादी या प्रबंधात दिलेली आहे. तिचा जिज्ञासू वाचकांना थोडाफार उपयोग होईल अशी आशा आहे. या बाबतींत मित्रवर्य प्रोफेसर चंद्रकांत भालचंद्र तेलंग यांनी दिलेल्या सहाय्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे. तसेंच प्रोफेसर गजानन शर्मा, आनंद कॉलेज धार, प्रोफेसर के.आर. इनामदार मिलींद महाविद्यालय औरंगाबाद, प्रोफेसर के.आर. रामचंद्रन नैयर मिलींद महाविद्यालय औरंगाबाद आणि प्रोफेसर अब्दुल बाकी यांनी अनुक्रमें हिंदी, कन्नड, मल्याळी आणि उर्दू भाषेतील आत्मचरित्रांची माहिती मिळवून देण्यासाठी जें सहकार्य केलें त्याबद्दल त्या सर्वांचा मी फार आभारी आहे.

या शिवाय मित्रवर्य श्री. प्रभाकर दत्तात्रय मेढी आणि मित्रवर्य श्री. एकनाथ वेडूजी अहिरे यांनी जें सहकार्य केलें त्याला खरोखर काही सीमा नाही. या प्रेमळ मित्रांचा मी फार आभारी आहे.

मित्रवर्य श्री. वल्लभाई पटेल आणि श्री. मुकुंद पुरुषोत्तम आपटे कडव लेन ठाणें यांनी हा प्रबंध मराठी टंक लेखन करण्यास जें सहाय्य केलें त्याबद्दल मी त्यांचाही आभारी आहे.

हें प्रबंधाचें कार्य मोठें जिकीरीचें, मेहनतीचें आणि अवघड असें होतें. परंतु डॉक्टर विश्वनाथ पांडुरंग उर्फ दादासाहेब दांडेकर, एम.ए., पीएच.डी. मराठी विभागाचे प्रमुख, महाराजा सयाजीराव युनिव्हरसिटी बडोदे, यांच्या मार्गदर्शनामुळें सोपें झालें. त्यांनी पीएच.डी. पदवीसाठी मला मार्गदर्शन करण्याचें मान्य केल्यावर जें प्रोत्साहन दिलें आणि जी सहानुभूती दाखविली ती अक्षरशः अवर्णनीय आहे. त्यांच्यासारख्या मर्मज्ञ, निष्ठावंत आणि व्यासंगी साहित्यिकाकडून मला मार्गदर्शन मिळालें हें माझें मोठें भाग्य असें मी मानतो. त्यांचा खरोखरच मी अत्यंत आभारी आहे. आणि मी येथे फक्त एवढेंच म्हणतो कीं त्यांच्या ऋणाची फेड होऊं शकेल असें मला वाटत नाही.

शेवटी ज्या परमेश्वराच्या कृपेमुळे हें कार्य पूर्ण झालें त्या पांडुरंगाच्या चरणीं नम्र होऊन मी आपली रजा घेतो.

२२/१२/१९६०
( मा. गो. दाभाडे. )

बडोदे,
गुरुवार दिनांक २२ डिसेंबर १९६०.